REGISTERED No. B. 3434

खरूज, गजकर्ण, नायटे वगैरे
त्वचा रोगांवर
**गोवा मलम**
पुण्यांत सर्वत्र मिळतें
—स्टार कंपनी, बेळगांव—

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १५ जानेवारी १९४७ अंक ३

दी
**बँक ऑफ कोल्हापूर, लि.**
*( कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली.)*
एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | ५,०६,५०० |
| भरलेलें | रु. | २,५३,००० |
| रिझर्व्ह | रु. | ४,०५,००० |

एकूण खेळतें भांडवल रु.२,००,००,००० हून अधिक
मुख्य कचेरी--बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.
शाखा : संस्थानांतीलः—(१) शाहुपुरी–कोल्हापूर, (२) गुजरी–कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ–वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरीलः—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)
★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.
★ मौल्यवान चजिवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.
—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
व्ही. ए. सावंत, ॲ. मॅनेजर

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.**
( शेड्यूल्ड बँक ) —:— हेड ऑफिस : पुणें शहर
( एकूण खेळतें भांडवल रु. २ कोटीचे वर )
बँकेतर्फें नवीन लोकोपयोगी व्यवस्था : एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीची स्थापना
—ट्रस्टी कंपनीचें भांडवल—

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ... | रु. २,५०,००० |
| वसूल झालेलें भांडवल... | रु. १,२५,००० |

—:बँकेच्या शाखा:—
डेक्कन जिमखाना, पुणें, खडकी, मुंबई (फोर्ट), गिरगांव, जळगांव, नागपूर ( सिताबर्डी व इतवारी ), रत्नागिरी, कोपरगांव, फैजपूर (पे–ऑफिस), सोलापूर, धुळें, चाळिसगांव, हुबळी, नाशिक, कल्याण.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
बँकेच्या व ट्रस्टी कंपनीच्या कामासंबंधीं मॅनेजर यांस भेटावें.
सी. व्ही. जोग
मॅनेजर

**आरको**
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

आंध्र खादीचे
(म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी
**महिंद्रकर ब्रदर्स**
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

**चात्यांच्या उत्पादनासाठी हिंदी कारखाना**—चात्या तयार करण्याचा एक कारखाना मुंबई शेजारी लवकरच सुरू होणार असून त्यांत जूनपासून उत्पादनास प्रारंभ होईल. दरमहा २०,००० चात्या तयार होतील व चार वर्षांनीं हें उत्पादन ४०,००० पर्यंत जाईल. दीड कोटि रुपयांच्या भांडवलापैकीं एका ब्रिटिश फर्मला २६ लक्ष रुपयांचे भाग त्याच्या पेटंटचे अधिकार व यंत्रें वापरण्याबद्दल दिले जातील, आणि आणखी १३ लक्ष रुपयांचे भाग ती फर्म घेईल. हिंदुस्थानांत एकूण २७,००,००० चात्यांच्या नव्या गिरण्या स्थापन होण्यास हिंदुस्थान सरकारनें संमति दिली आहे.

**दारूबंदीची योजना**—मुंबई प्रांतांत चार वर्षांत पूर्ण दारूबंदी करण्याची योजना सरकारनें आखली आहे. युरोपियनांनाहि दारू मिळणार नाहीं.

**साखर तुटवड्यावर उपाय योजना**—साखरेचें जागतिक उत्पादन अद्याप युद्धपूर्व उत्पादनापेक्षा पुष्कळच कमी आहे. १९४६ चे मानानें १९४७ मधील उत्पादन अधिक भरलें तरी साखरेचा तुटवडा कायमच रहाणार आहे. इकडे हिंदुस्थानांत, मागील मोसमाचे मानानें चालू मोसमांत ५ ते १०% उत्पादन ज्यास्त होईल, अशी अपेक्षा आहे. तेवढ्यानें साखरेचें रेशन वाढवितां येणार नाहीं, हें उघड आहे. बाहेरून साखर आयात करण्याचा हिंदुस्थान सरकार प्रयत्न करीत आहे. त्याचप्रमाणें, नव्या ४५ कारखान्यांची स्थापना करण्यांत यावयाची आहे. हे कारखाने संयुक्तप्रांत व बिहार ह्यांच्या बाहेरच उभारले जातील. हिंदुस्थानांतील साखरेचें उत्पादन घटलें आहे, त्यावर वरील उपाययोजना आखण्यात येत आहे.

**रिझर्व्ह बँक बुलेटिन**—रिझर्व्ह बँक दर महिन्यास आकडेवार माहिती देणारें एक पत्रक प्रसिद्ध करीत असते. त्याचा डिसेंबर, १९४६ चा अंक निघाला म्हणजे त्याची जागा "रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिन" घेणार आहे. त्यांत वरील आकडे प्रसिद्ध होऊन शिवाय, मासिक आर्थिक समालोचन, आर्थिक विषयांवर लेख, ग्रंथ परीक्षण, बँकिंग विषयक हिंदी व विदेशी नवे कायदे, इत्यादींहि बाबींचा समावेश होणार आहे.

**बहुपुती मातांना पदकें व अलावन्स**—रशियांत लोकसंख्येच्या वाढीस सरकार उत्तेजन देतें. ५–६ मुलांच्या आईस 'मदरलँड मेडल,' ७–९ मुलांच्या आईस 'मदरहूड ग्लोरी,' १० मुलांच्या आईस 'हिरॉइन मदर,' अशीं बहुमानार्थ पदकें तेथील मातांना मिळतात. यशस्वी लष्करी योद्धे किंवा उद्योगपति ह्यांचा ज्याप्रमाणें सत्कार करण्यांत येतो, त्याचप्रमाणें बहुपुती मातांचा क्रेमलिन मध्यें सत्कार केला जातो. तीन किंवा तीन पेक्षा ज्यास्त मुलांच्या मातास सरकारकडून खास रोख अलावन्सहि मिळतो. गेल्या दोन वर्षांत अशा रीतीनें १८ लक्ष मातांना हा अलावन्स मिळाला.

**गव्हाच्या रेशनमध्यें कपात**—दक्षिण हिंदुस्थान, मुंबई, त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर, इत्यादि दुष्काळी विभागांस गहूं देतां याव म्हणून हिंदुस्थान सरकारनें गेल्या वर्षी सिंध, पंजाब व संयुक्त प्रांत ह्यांचेकडून गहूं उसना घेतला. तो परत फेडणें अशक्य झालें आहे. त्यामुळें, गव्हाच्या रेशनमध्यें आणखी कपात होणें अपरिहार्य आहे.

**पंजाबमधील नवे रस्ते**—पंजाब सरकारनें येत्या १५ वर्षांत ६,००० मैल लांबीचे नवे रस्ते तयार करण्याचें योजिलें आहे. त्याला १५ कोटि रुपये खर्च येईल.

**बन्सीलाल अमृतलाल कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर**—वरील नांवाचें एक शेतकी कॉलेज खेडा जिल्ह्यांत आनंद येथें काढण्यासाठी शेठ अमृतलाल हरगोविनदास ह्यांनीं ५ लक्ष रुपये मुंबई सरकारला दिले आहेत.


लग्नसमारंभास व मेजवानीसाठीं

—रूप्रॉक्सचा—

शुद्ध साखरेचा केशरयुक्त

:: सुधारस ::

वापरा

बाटली किंमत २–८–०

घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.

मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सीज, ५५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.

दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसेंः—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर (बुधगांव) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
|---|---|---|
| किसान नं. १०१ (सहा ते आठ बैली) | | विश्वास (चार बैली) |
| किसान नं. १०२ (चार ते सहा बैली) | | वासुदेव (दोन बैली) |
| किसान नं. १०५ (दोन ते चार बैली) | | राजा (एक बैली) |

'मधुकर' (सात फण्याचे) कोळपें (दोन बैली)

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

# अर्थ

बुधवार, ता. १५ जानेवारी १९४७





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## ग्रेटब्रिटनमध्यें प्रवाशांची आयात

ग्रेटब्रिटनमध्यें चालू वर्षी बाहेरून सुमारें २,५०,००० प्रवासी येतील व ते सुमारें २½ कोटी पौंड तेथें खर्च करतील, अशी अपेक्षा आहे. ही रकम कालांतरानें १० कोटी पौंडांपर्यंतहि जाईल. युद्धापूर्वी, सरासरीनें ७,००,००० प्रवासी ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल ४ कोटि पौंड वहातुक, हॉटेल, करमणुकी, दुकानांतील खरेदी, इत्यादींवर खर्च करीत असत. यंदाचे वर्षी येणारे प्रवासी मुख्यतः अमेरिकन व कनेडिअन असतील आणि आगबोटींत जागा मिळण्याची अडचण ही फक्त एकच गोष्ट त्यांची संख्या मर्यादित करणार आहे. प्रवाशांचें ग्रेटब्रिटनमधील वास्तव्य आकर्षक करण्याच्या दृष्टीनें ब्रिटिश सरकारचें "टाऊन अँड कंट्री प्लॅनिंग" खातें विशेष प्रयत्न करीत आहे.

प्रवाशांस आपल्या देशांत आकर्षून त्यांना खर्च करावयास लावणें, हा एक राष्ट्रीय महत्त्वाचा धंदा आहे. युद्धकालापूर्वी, इजिप्त, इटली, स्वित्सरलंड इत्यादि देशांत बाहेरून फार मोठ्या प्रमाणावर प्रवासी येत असत आणि त्यांत श्रीमान् अमेरिकन लोकांचा भरणा मोठा असे. इकडे, हिंदुस्थानांतहि, म्हैसूरचें किंवा काश्मीरचें उदाहरण देतां येईल. केवळ हिंदुस्थानांतील नव्हे, तर परदेशांतील लोकहि तेथें जाऊन आपली पैशाची थैली मोकळी करतात, हें सुप्रसिद्धच आहे. प्रवाशांच्या येण्यामुळें आर्थिक देवघेव कशी होते, हें चटकन् लक्षांत येत नाहीं. प्रवासी आपल्याबरोबर सोनें घेऊन कांहीं जात नाहीं; तो एजन्सीचें काम करणाऱ्या एखाद्या कंपनीकडे पैसे भरून प्रवासाची व्यवस्था करतो. समजा, एक इंग्रज प्रवासी हिंदुस्थानांत आला आहे. तो आपल्याबरोबर येथील एखाद्या बँकेवरचा ड्राफ्ट, लेटर ऑफ क्रेडिट, वगैरे घेऊन येईल आणि त्यांतून आपल्या रेल्वे, मोटार, टॅक्सी, हॉटेल, इत्यादींच्या खर्चांची तरतूद करील व वस्तूंच्या खरेदीचे पैसेहि भागवील. हे पैसे इंग्रज प्रवाशास ज्या लेटर ऑफ क्रेडिट किंवा ड्राफ्ट ह्यांचे द्वारां येथें उपलब्ध होतील, ते कागद इंग्लंडमध्यें परत जातील व तेथील हिंदी बँकेच्या शाखेंत जमा होतील. हिंदुस्थानानें इंग्लंडमधून कांहीं माल मागविला असेल, त्याचे पैसे देऊन टाकण्यास ही रक्कम उपयोगी पडेल. ह्याचा अर्थ, इंग्रज गृहस्थानें हिंदुस्थानांत चैनीसाठी प्रवास केला, तरी त्याचा खर्च भागविण्यासाठी इंग्लंडनें हिंदुस्थानाकडे तेवढ्या किंमतीचा माल पाठविला पाहिजे, असा होतो. इंग्लंडमध्यें आतां मोठ्या प्रमाणावर प्रवासी जाऊं लागले व तेथें खर्च करूं लागले, म्हणजे इंग्लंडला त्या प्रमाणांत बाहेरून माल आयात करता येईल व त्याची किंमत देऊन टाकण्याचें साधन प्राप्त होईल. विशेषतः अमेरिकन डॉलर खर्चण्यास मिळण्याची अडचण आहे, ती अमेरिकन उतारूंच्या इंग्लंडमधील प्रवासानें व मुक्कामानें थोडीफार तरी दूर होईल.

परदेशी प्रवाशांना आकर्षणें राष्ट्राच्या हिताचें कसें असतें, हें लक्ष्यांत आलें म्हणजे प्रवाशांच्या सुखसोईकडे अगत्यपूर्वक पहाणें क्रमप्राप्तच होतें. ब्रिटिश सरकारनें परदेशी प्रवाशांची बरदास्त राखण्यासाठी "टूरिस्ट केटरिंग अँड हॉलिडे बोर्ड" निर्माण करण्याचें योजिलें आहे. प्रवाशांच्यावर ज्यांचे धंदे अवलंबून आहेत (उ. हॉटेलें इ.) अशांचे १२ प्रतिनिधी त्या बोर्डावर काम करतील. ह्या शेरीज, स्कॉटलंड, वेल्स, कामगार संघ व सहकारी सोसायट्या ह्यांसहि बोर्डावर प्रतिनिधित्व मिळेल. देशांतील एखाद्या महत्त्वाच्या धंद्याच्या प्रगतीसाठी सरकार विशेष उपाययोजना करते, तद्वतच प्रवाशांच्या आयातीच्या धंद्याबाबत ब्रिटिश सरकार काळजी वहात आहे. युद्धकाळांत लक्षावधि लोकांना इंग्लंडची वारी करतां आली नाहीं. ते सर्व इंग्लंडला भेट देण्यास उत्सुक झालेले असणें स्वाभाविक आहे. उत्साहाचा मानसिक व बौद्धिक लाभ प्रवाशांना झाला तरी आर्थिक लाभ इंग्लंडलाच होणार आहे.

## हिंदी आयुर्विम्याचें राष्ट्रीयकरण—का नको व का हवें?

गेल्या वर्षीच्या विमा वार्षिकांत हिंदी आयुर्विमा व्यवसायाचें राष्ट्रीयकरण करण्यांतील फायद्यांचा विस्तारानें आढावा घेण्यांत आला होता. १९४६ च्या ताज्या विमा वार्षिकांत, त्याविरुद्ध बाजूच्या मुद्यांचा मथितार्थ देऊन त्यास उत्तरें देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. राष्ट्रियकरणाचा प्रश्न येथें केवळ आयुर्विम्यापुरताच मर्यादित केलेला आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे.

| राष्ट्रीयकरण का नको? | राष्ट्रीयकरण का हवें? |
|---|---|
| (१) सरकारला व्यवसायाचा दीर्घ अनुभव, तज्ज्ञ माहिती असणें अशक्य आहे. | (१) सध्या ह्या व्यवसायांत असणारांची नेमणूक करून त्यांच्या अनुभवाचा फायदा सरकारला घेतां येईल. |
| (२) सरकारी व्यवस्थेंत ताठरपणा येऊन, ह्या प्रकारच्या व्यवसायास आवश्यक अशी जुळतें घेण्याची वृत्ति त्यांत रहाणार नाहीं. | (२) रेल्वे, पोस्ट, तार, टेलिफोन, इत्यादि खातीं शांतता काळांत सरकार चालवीत आहेच, आणि युद्ध काळांत तर आणखी कित्येक उपक्रम सरकारनेंच चालविले. |
| (३) ग्रेट ब्रिटनमध्यें ह्यासंबंधांत मागें प्रयत्न झाले, ते अयशस्वी ठरले होते. | (३) तेथें एजंट न नेमतां योजना सुरू केली होती व तिला पुरेसा अवधि दिला नव्हता. खुद्द हिंदुस्थानांत म्हैसूरचें सरकारी विमा खातें यशस्वी रीतीनें चालू आहे. |
| (४) योजनांतील विविधता नष्ट होईल. | (४) जी गोष्ट कंपन्या करतात, ती सरकारहि करूं शकेल. |
| (५) विम्याचा प्रचार वाढणार नाहीं. | (५) उलट होईल. सरकार "विम्या"चा प्रचार करील; सध्या कंपन्या केवळ आपल्या स्वतःचाच प्रचार करतात. जेथें विम्याचें काम सुलभतेनें मिळेल अशाच ठिकाणीं प्रचार केंद्रीभूत न करतां सरकार सर्व प्रदेशांवर लक्ष देऊं शकेल. |
| (६) एजंटांचें नुकसान होईल. | (६) उलट घडेल. त्यांना त्यांच्या कामाचें शिक्षण देतां येईल. प्रत्येकाला क्षेत्र वाटून दिलें म्हणजे त्याला पुरेसें काम मिळूं शकेल. |
| (७) हितकारक स्पर्धा नष्ट होईल. | (७) कार्यक्षमतेस स्पर्धा आवश्यक असतेच, असें नाहीं. |
| (८) कार्यक्षमतेचा अभाव सरकारी मदतीच्या पांघरुणाखाली दडवला जाईल. | (८) आकडेवारीनें हिशेब करून खरी परिस्थिति केव्हांहि उघड करतां येते. |
| (९) परदेशांतील आयुर्विम्याचें काम मंदावेल. | (९) आज हिंदी कंपन्या बाहेर जेवढें काम मिळवतात त्यापेक्षां हिंदुस्थानांत विदेशी कंपन्यांस ज्यास्त काम मिळत आहे. तेव्हां, स्वयंपूर्णता अगोदर प्राप्त केलेली बरी. |
| (१०) तांत्रिक प्रगति मंदावेल. | (१०) सरकारी नोकरहि तिला हातभार लावूं शकतील. |
| (११) आज काम करीत असलेल्या लोकांच्या तोंडचा घास काढून घेतला जाईल. | (११) योग्य भरपाई केली जाईल. सर्व कार्यक्षम लोक व एजंट सरकारला नेमतां येतील. |

# स्फुट विचार

## हिंदी शास्त्रीय परिषद् आणि पं. नेहरू

नवी दिल्ली येथें भरलेल्या हिंदी शास्त्रीय परिषदेच्या अध्यक्षपदावरून हंगामी सरकारचे उपाध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांनीं केलेलें भाषण त्यांच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीस साजेसें असेंच झालें. शास्त्र या शब्दाला अलीकडे कांहीं वर्षांत 'भौतिक–शास्त्र' असाच अर्थ नकळत रूढ झालेला होता. मनुष्य–समाजाच्या सभोवतीं पसरलेल्या वस्तुजातीचा अभ्यास व संशोधन करणें एवढीच काय ती शास्त्रज्ञाची कामगिरी, असा समज अगर गैरसमज सामान्यपणें प्रचलित आहे. केवळ सत्यशोधनापलीकडे ( आणि तेंही भौतिक सृष्टीपुरतेंच मर्यादित असे ) शास्त्रज्ञाला कांहीं कर्तव्य नाहीं या रूढ समजुतीला पं. नेहरूंनीं आपल्या भाषणानें इष्ट असा धक्का दिला. सत्य–संशोधन करून नामानिराळें न होतां आपल्या संशोधनाचा उपयोग कसा करण्यांत येत आहे इकडेही शास्त्रज्ञांनीं लक्ष देणें जरूर आहे असा गर्भित इषारा पंडितजींच्या भाषणात आहे; आणि शास्त्रज्ञानाचा उपयोग संहारक कार्यासाठी मोठ्या प्रमाणावर केल्या जाणाऱ्या सध्यांच्या युगांत हा इषारा अत्यंत महत्त्वाचा आहे. पं. नेहरू-सारख्या राज्य व समाजशास्त्रज्ञानें रूढ अर्थानें शास्त्रज्ञ असलेल्या विद्वानांना उपदेश करणें यांत औचित्य आणि उपयुक्तता यांचा संगम झालेला आहे. कारण भौतिक शास्त्रें बाह्य सृष्टीचें नियमन करूं शकत असलीं तरी शास्त्रज्ञानाचे सामाजिक व राजकीय परिणाम काय होतात हें तीं शास्त्रें सांगू शकत नाहींत. त्यासाठी समाजशास्त्रांचीच कांस धरणें इष्ट आहे. पं. नेहरूंच्या भाषणांत शास्त्रीय संशोधन व विचार यांचा समाजरचनेशीं निकट परिचय असल्याचा महत्त्वाचा मुद्दा मांडण्यांत आला आहे. शास्त्रीय समाजवादी भूमिका, तिचें अर्थशास्त्र व राजकारण याच महत्त्वाच्या सिद्धांतावर आधारलेलें असल्यामुळें पंडितजी-सारख्या पुढाऱ्यांच्या भाषणांत, त्या भूमिकेचा पडसाद उठणें अपरिहार्यच होतें. अणु बॉंबच्या शोधामुळें जगांत एका नव्या युगाला प्रारंभ होत आहे यांत कांहीं शंका नाहीं. पण हें नवयुग जगाच्या विनाशास कारण होणार कीं समृद्धीला हातभार लावणार हें अजून ठरावयाचें आहे. आज अणु–बॉंबचें गुपित फक्त अमेरिकेजवळ असल्यामुळें जागतिक राजकारणांत, एकप्रकारचा अस्वस्थतेचा व अशांततेचा सूर मधून मधून उमटतो. पुन्हा, अणु–बॉंबचें गुपितही खाजगी कंपन्यांच्या मालकीचें आहे. अशा परिस्थितींत शास्त्रज्ञांनीं, आपल्या ज्ञानाचा उपयोग उघडपणें लोककल्याणार्थच झाला पाहिजे असा आग्रह धरला पाहिजे. नाहीं तर शास्त्राचें सुदर्शन मनुष्य जातीच्या मुळावर आल्याखेरीज रहाणार नाहीं.

---

## व्यापारी कराराची वटहुकूमानें पूर्ती

हिंदुस्थानांतील अन्न–धान्याची टंचाई भरून काढण्यासाठी बाहेरच्या देशांतून अन्न–धान्य आयात करण्याचे जे प्रयत्न हिंदुस्थान सरकारनें केले, त्यांतच हिंदुस्थान व अर्जेंटायना यांच्यांतील कराराचा समावेश होतो. अर्जेंटायना देशांतील धान्याची परिस्थिति बरीच समाधानकारक असल्यानें त्या देशाच्या सरकारनें हिंदुस्थानला अन्न–धान्य पुरविण्याचें कबूल केलें. करारान्वयें सुमारें ३ लाख टन अन्नधान्य हिंदुस्थानला पुरवावयाचें होतें; व त्यापैकीं बहुतेक पुरवठा करण्यांत आलेला आहे. परंतु याच कराराप्रमाणें हिंदुस्थानकडून अर्जेंटायनाला ३० हजार टन ताग पुरविण्याचें ठरलें होतें. हिंदुस्थान सरकारला हा तागाचा पुरवठा मिळणें जड जाऊं लागल्यामुळें सरकारला अखेर एक वटहुकूम काढावा लागला. या वटहुकुमान्वयें १८,४०० टन तागाच्या साठ्याची खरेदीविक्री करण्याला बंधन घालण्यांत आलें असून तो साठा सरकारला मिळेल, निदान मिळावा अशी सरकारची अपेक्षा होती. परंतु ही अपेक्षा फलद्रुप होण्याचींही चिन्हें दिसेनात. त्यामुळें सर्व बंगालमधील तागाच्या साठ्याचा ताबा घेण्याचें सरकारनें ठरविलें; आणि अशा रीतीनें आपण दिलेल्या व्यापार वचनाला जागून अर्जेंटायनला ताग पुरविण्याची व्यवस्था सरकार करणार आहे. ताग ही वस्तू फक्त हिंदुस्थानांत व्यापारी निर्गत करण्याइतकी पैदा होते. त्यामुळें सध्याच्या टंचाईच्या दिवसांत तागाला जगभर मागणी आहे. अर्थातच त्याच्या किंमती चढत्या आहेत. खाजगी व्यापार चालू आहे तोपर्यंत उत्पादक अगर दलाल व्यापारी आपल्या मालाला जास्तींत जास्त किंमत येण्यासाठी झटणारच. अशा परिस्थितींत खाजगी व्यापार व सरकारी व्यापार यांच्यांत स्पर्धा उत्पन्न झाल्यास सरकारला खुल्या बाजारांत माल मिळणें कठीण जातें. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारांत कोणत्याही सरकारला आपली पत राखावयाची असल्यास वेळ–प्रसंगीं वरील सारखे वटहुकूम काढणें भागच पडतें. शिवाय हिंदुस्थानच्या बिकट अन्न-धान्य परिस्थितींत अर्जेंटायनाकडून योग्य वेळीं जी मदत झाली तीही विसरून चालणार नाहीं. तेव्हां सरकारी करारांची पत आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचे नाजूक संबंध या दोन्ही दृष्टींनीं हिंदुस्थान सरकारचा वटहुकूम योग्य असाच म्हटला पाहिजे. अपवाद म्हणून कां होईना पण देश-हितासाठी शासन संस्थेला व्यापारांत हात घालण्याचा हक्क आहे, आणि तोच प्रस्तुत प्रसंगीं हिंदुस्थान सरकारनें बजाविला आहे.

---

## नुकसानी कोणाची व भरपाई कोणाला ?

हिंदुस्थानांतील ज्या सनदी नोकरांना नव्या हिंदी राजवटींत नोकरी करावयाची नसेल, त्यांना त्यांच्या नोकरीच्या मुदतीचे प्रमाणांत पेन्शन मिळावें व नुकसानभरपाई मिळावी, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारशीं वाटाघाटी करण्याकरितां उपभारत मंत्री मि. हेंडरसन हे दिल्ली येथें आले आहेत. मागितलेल्या नुकसानभरपाईचा आकडा २० ते २५ कोटि रुपये आहे. " हिंदुस्थान सरकार ह्या नोकरांना काढून टाकीत नाहीं; ते आपण होऊन सेवानिवृत्त होऊं पहातात. तेव्हां नुकसानभरपाईचा प्रश्न उपस्थित होतो कोठें ? मध्येंच नोकरी सोडल्याबद्दल नोकरानेंच मालकाची म्हणजे सरकारची नुकसानभरपाई केली पाहिजे " असा प्राथमिक मुद्दा सरदार वल्लभभाई पटेल ह्यांनीं मि. हेंडरसन ह्यांचेशीं झालेल्या बोलण्यांत उपस्थित केला आहे. कांहीं हिंदी सनदी नोकरहि पेन्शन व नुकसानभरपाई मागीत आहेत, त्यांची मागणी तर सरदार पटेल ह्यांनीं देशद्रोही ठरविली आहे. एकूण १,००० आय. सी. एस. अधिकाऱ्यांपैकीं सुमारें निम्मे व आय. पी. मधील ६०० अधिकाऱ्यांपैकीं सुमारें ३५० इंग्रज आहेत.

---

## साखर, कागद, कापड, लोखंड, पोलाद, ह्या धंद्यांच्या संरक्षणाचा प्रश्न

साखर, कागद, कापड, लोखंड, पोलाद, इत्यादि हिंदी धंद्यांची कसोशीनें चौकशी करून त्यांना संरक्षण मिळावें अशी पूर्वीच्या टारिफ बोर्डानें शिफारस केली होती व त्याप्रमाणें त्यांना संरक्षण देण्यांत आलें होतें. ह्या संरक्षणाची मुदत वास्तविक युद्ध सुरू झाल्यानंतर लवकरच संपली होती, ता वरचेवर वाढविली गेली. आतां ही मुदत ३१ मार्च, १९४७ रोजीं संपत आहे. युद्धकाळांतील आर्थिक परिस्थिति अस्थिर असल्याकारणानें पुनः नवी चौकशी करणें सोईचें नव्हतें आणि अजूनहि ती अडचण कायमच आहे. नव्यानें चौकशी करण्यापूर्वी, सध्याचें संरक्षण कायम ठेवणें आवश्यक आहे किंवा काय, ह्याबद्दल टारिफ बोर्डाचें मत हिंदुस्थान सरकारास हवें आहे. हें मत विचारांत घेऊन, ३१ मार्च, १९४७ नंतर संरक्षण चालू ठेवावयाचें किंवा नाहीं हें सरकार ठरवील व त्याप्रमाणें विधिमंडळांत कायदा करून घेईल. टारिफ बोर्डाकडे हें तांतडीचें काम आलें असल्यानें, त्याचें सध्या चालू असलेलें चौकशीचें काम तहकूब ठेवण्यांत आलें आहे, आणि कापड, लोखंड, पोलाद, कागद, रांधा, साखर, इत्यादि धंद्यांच्या हितसंबंधी लोकांशीं टारिफ बोर्ड प्रथम चर्चा करणार आहे, ती फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत चालेल.

---

**सूर्यग्रहण पहाण्यासाठी १,००० शास्त्रज्ञ जमणार**— २० मे, १९४७ रोजीं सूर्यग्रहण होणार आहे. तें पहाण्यासाठी ब्राझिल देशांत अराक्षा येथें वेगवेगळ्या देशांतील १,००० शास्त्रज्ञ जमणार आहेत. सूर्य-ग्रहण पहाण्यास अराक्षा ही जागा सर्वांत योग्य ठरविण्यांत आली आहे.

# भाडेंनियंत्रण कायद्यामुळें घरमालकांवर झालेला अन्याय

लेखकः—श्री. वि. त्र्यं. शेटे, बी. ए., एलएल. बी.

युद्धकालीन परिस्थितीमुळें सरकारला जे अनेक झटपटीचे निर्णय घ्यावे लागले त्यांतीलच भाडेंनियंत्रण कायदा हाहि एक निर्णय आहे. त्यावेळच्या विशिष्ट परिस्थितीमुळें ज्यांच्यावर अन्याय झाला अशा घरमालकांनीं युद्ध संपेपर्यंत कांहीं तक्रार केली नाहीं व अनेक अडचणींना तोंड देऊन व प्रसंगीं पोटाला चिमटा घेऊनही सरकारला या कामीं मदतच केली. युद्धामुळें सरकारला आपलीं अनेक खातीं वाढवावीं लागलीं व सरकारी नोकरांचीं भरतीही अवाढव्य प्रमाणावर करावी लागली अर्थात् या सर्वांची राहाण्याची सोय सरकारला युद्धाच्या धाऊगर्दींत करतां येणें शक्य नसल्यानें सरकारनें सदरील भाडेंनियंत्रण कायदा जारी करून घरभाडेकरूंना एकप्रकारचें कायदेशीर संरक्षण दिलें. या कायद्यामुळें भाडेकऱ्यांना मिळालेल्या दोन मुख्य सोयी म्हणजे ते राहात असलेल्या जागेला सप्टेंबर १९४० पूर्वी जें भाडें होतें तेवढेंच भाडें त्यांना द्यावें लागणार, जास्त भाडें घरमालकांना त्यांचेकडून घेतां येणार नाहीं; व दुसरी सोय म्हटली म्हणजे ते जोंपर्यंत भाडें वेळचे वेळीं देत राहातील तोंपर्यंत त्यांना जागेंतून काढून टाकतां येणार नाहीं. अर्थात् त्यांनीं जर घरमालकास त्रास देण्यास सुरवात केली अगर घरमालकांना जर स्वतःचे उपयोगाकरतां खरोखरच जागा लागली तर मात्र सदरील जागेंतून अशा भाडेकऱ्यास काढून टाकण्याची सोय करून ठेवली होती. परंतु कोर्टांत मात्र शेकडा ५ घरमालकांनाही या कलमांचा आधार घेऊन जागा आपल्या ताब्यांत मिळवितां आल्या नाहींत. याप्रमाणें भाडेकरूंच्या सुखसोयींची व्यवस्था लावल्यावर सरकारला इतर गोष्टींकडे लक्ष देण्याची जरूर भासली नाहीं.

परंतु आतां युद्धकाल संपल्यानंतरही व सरकारी नोकरांची संख्याही दिवसेंदिवस कमी होत असतांना हा कायदा अस्तित्वांत ठेवण्याचें वास्तविक पुण्यांत किंवा इतर जिल्ह्याचे ठिकाणीं तरी कारण नाहीं. बरें, तो कायदा अस्तित्वांत ठेवावयाचा झाल्यास त्या कायद्याची उभारणी भाडेकरू व घरमालक या दोघांनाही न्याय मिळेल अशा तत्त्वांवर व्हावयास पाहिजे; परंतु वस्तुस्थिति मात्र याच्या उलट असून सर्वस्वी भाडेकरूंचीच बाजू विचारांत घेऊन या कायद्याची उभारणी व घटना झाली आहे हें खालील दोन–तीन गोष्टींचा विचार केल्यास दिसून येण्यासारखें आहे.

**भाड्यांत वाढ नाहीं:**—सर्व भाडेकरू हे गरीब असून सर्व घरमालक हे श्रीमंत आहेत ही जी कल्पना सरकारनें सोईस्करपणानें करून घेतली आहे ती खुळचट असून त्यास कोणत्याही चौकशीचा किंवा तत्त्वाचा आधार नाहीं. पुष्कळसे भाडेकरी व्यापारी किंवा उच्च दर्जाचे पगारी नोकर असून त्यांच्या मासिक उत्पन्नांत भरमक्कम वाढ झाली असूनही त्यांना द्यावें लागणारें घराच्या जागेचें भाडें मात्र युद्धपूर्वीच्या मंदीच्या काळांतलें आहे. पुण्यांतील किंवा इतर जिल्ह्याच्या ठिकाणचे घरमालक हे बहुसंख्येनें मध्यम स्थितींतले असून त्यांपैकीं पुष्कळांनीं आपलें सर्व धन घरांच्या बांधणींत वेंचलें असल्यानें त्यांची जीवितयात्रा घरभाड्यावरच अवलंबून असते. तेव्हां भाडेकऱ्यांची वाढतें भाडें देण्याची स्थिति असतांना व सर्व जीवनावश्यक वस्तूंचे दर पूर्वीपेक्षां चौपट वाढले असतांना घरमालकांना मात्र युद्धपूर्वीचें मंदीच्या काळांतलें भाडें घेण्यास सांगणें किती अन्यायाचें आहे हें तेव्हांच दिसून येईल. अशा परिस्थितींत घरमालकांना दुरुस्तीसाठीं आवश्यक तो मालमसाला सरकार नियंत्रित दरानें पुरवीत असेल म्हणावें तर तशीही वस्तुस्थिति नाहीं. वाढत्या लोकसंख्येला जादा घरें उपलब्ध करून द्यावीं म्हणून सरकार कांहीं घरें बांधण्याचा तातडतोबीचा कार्यक्रम आंखत असेल अशी जर कोणी कल्पना केली तर तेथेंही त्याची फसगत होईल. बरें, सरकार स्वतः घरें बांधत नाहीं म्हणून तीं बांधणारांना उत्तेजन देत असेल तर त्याही बाबतींत निराशाच. अशीं घरें बांधणारांना सरकार नियंत्रित दरानें बांधकामास लागणारा मालमसाला पुरवावयासही तयार नाहीं किंवा घरें बांधण्याच्या कामीं जी रक्कम खर्ची पडेल त्यावर निव्वळ ५ किंवा ६ टक्के दराचें व्याज पडेल असें भाडें आकारावयाला कांहीं हरकत नाहीं अशीही तरतूद कायद्यांत करावयास सरकार तयार नाहीं.

तेव्हां स्वतःची जबाबदारी तर टाळावयाची परंतु घरमालकांची भाडें वाढविण्याच्या कामीं गळचेपी करावयाची असें निर्हेतुक धोरण पत्करण्यापासून काय फायदा? सरकारनें चालू भाड्यांत शेंकडा ५० टक्केची वाढ करण्याची परवानगी दिल्याखेरीज घरमालकांवरील हा ढळढळीत अन्याय दूर होणार नाहीं. मद्रासच्या कॉंग्रेस सरकारनें शेंकडा २५ ते ५० टक्केपर्यंत भाड्यांत वाढ करण्यास परवानगी दिली आहे हें येथील सरकारनें नवीन कायदा करतांना अवश्य ध्यानांत ठेवावें. अशा परिस्थितींत सरकारनें प्रॉपर्टी टॅक्स बसवून घरमालकांवरील अन्यायांत आणखी भरच घातली आहे.

**( २ ) पोटभाडेकरीः**—सदर कायद्यांतील दुसरा एक ढोबळ दोष म्हणजे भाडेकऱ्याला पोटभाडेकरी ठेवण्याचा दिलेला अधिकार. कोणत्याही कायद्याची उभारणी कांहीं निश्चित तत्त्वें अगोदर मनाशीं ठरवून मग तीं अमलांत कशीं आणावयाचीं व त्यांचा मांड कसा मांडावयाचा याच्यावर अवलंबून असते; परंतु भाडेंनियंत्रण कायद्याची रचना पाहिली तर मात्र त्यांत कांहीं निश्चित तत्त्वांचा आधार न घेतां केवळ कांहीं गोष्टी सुचल्या त्या कलमांत घुसडून दिल्या असा प्रकार झाला आहे. भाडेकरूस आपल्या जागेपैकीं कांहीं जागा नको असल्यास ती त्यानें वास्तविक मालकाच्या ताब्यांत देऊन त्यानें ती आपल्या पसंतीच्या दुसऱ्या भाडेकऱ्यास द्यावयाची असा खरा प्रश्न आहे. परंतु सरकारनें सदरचा हक्क भाडेकऱ्यास दिलेला असल्यानें पुष्कळ वेळां भाडेकरूंना पैसे मिळविण्याचें तें साधन झालें असून मूळचे भाडेकरी जाऊन सांखळीप्रमाणें अनेक निरनिराळ्या स्वभावाच्या व संस्कृतीच्या भाडेकरूंची रांग त्या जागेंत लागते व मूळ घरमालकाला कांहींहि न करतां येऊन स्वस्थ बसावें लागतें. या कायद्याप्रमाणें एखाद्या भाडेकऱ्याचें जर घरमालकाशीं पटलें नाहीं तर हिंदु घरमालकाच्या घरांत मुद्दाम त्रास देण्याचे हेतूनें मुसलमान पोटभाडेकरी म्हणून भाडेकरूस ठेवतां येईल अगर शाकाहारी मालकाच्या घरांत बिनशाकाहारी पोटभाडेकरूस घुसवितां येईल. अशीं उदाहरणें पुण्यांत झालीं आहेत.

**( ३ ) मालकांवरील इतर अन्यायः**—याचबरोबर इतरही अनेक अन्याय घरमालकांवर करण्यांत आले आहेत. घरमालकास जर त्याचे घरीं कोणी आजारी पडल्यानें अगर मुलांचीं लग्नें झाल्यानें अगर त्याचे भाऊ अगर बहिणी त्याचेकडे राहाण्यास आल्यानें ज्यास्त जागेची जरूरी लागली तर बिऱ्हाडकरूकडची जागा त्यास स्वतःसाठीं मिळण्यास फार पंचाईत पडते; तसेंच एखादा भाडेकरी जर त्रासदायक भेटला तर कोर्टांत जाऊन तो देत असलेल्या अनेक प्रकारच्या त्रासांची नामावली वाचून त्यास काढून टाकणें दुष्प्राप्य होतें. दुरुस्तीसाठीं किंवा नवीन बांधकामासाठीं घरांतील कांहीं भाग ताब्यांत घ्यावयाचा असल्यास त्याबाबतींतहि पर्वतप्राय अडचणी उभ्या आहेत. भाडेकरूस ज्याप्रमाणें महिन्याचे महिन्यास भाडें दिल्यास जागेंत कायम रहाण्याचा ताम्रपट दिला आहे त्याप्रमाणें जर भाडेकरूनें वेळचेवेळीं भाडें दिलें नाहीं तर त्याचेसाठीं मात्र कांहीं जादा अधिकार मालकास दिले नाहींत; त्यासाठीं त्यास १ ते १॥ वर्षं कोर्टांत फिर्याद चालवावी लागते व मग येणें रक्कम कोर्टानें मंजूर केलेल्या बिनव्याजाच्या तीन वर्षांच्या हप्तेबंदींत फेडून घ्यावी लागते.

**( ४ ) अंमलबजावणीची बोजड व्यवस्थाः**—सरकारनें या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जी व्यवस्था केली आहे ती तर फारच विचित्र आहे. जागा ताब्यांत घ्यावयाची असल्यास अगोदर रेंटकंट्रोलरकडून सर्टिफिकेट मिळवावयाचें व मग दिवाणी कोर्टांत हेलपाटे घालावयाचे. रेंटकंट्रोलरला अमर्यादित अधिकार दिले असून त्यांनीं न्याय कसा द्यावयाचा यावर मात्र कांहीं बंधन अगर मार्गदर्शन नाहीं. रेंटकंट्रोलरवर कोणत्याही न्यायाधिशाच्या अपिलेट अधिकाराचें नियंत्रण नाहीं.

**उपायः**—सरकारची जर भाडेकरू व घरमालक या दोघांनाही खरा न्याय देण्याची इच्छा असेल तर दोघांचीही सोय होईल असा कायदा करावा व त्यांत पुढील गोष्टींचा अवश्यमेव समावेश व्हावाः—

( १ ) घरमालकांना चालू घरभाड्यांत शेंकडा ५० टक्के वाढ करण्याची परवानगी द्यावी.

( २ ) घरमालकांवर म्युनिसिपालटी अगर सरकार जे जे कर बसवील ते ते त्या त्या प्रमाणांत भाडेकरूंकडून वरील कलमांतील वाढीशिवाय वसूल करून घेण्याची परवानगी असावी.

( ३ )भाडेकरू वेळेवर भाडें देत असेल तोंपर्यंत त्यास काढून टाकण्याचा अधिकार मालकांना तो त्रास देत नसल्यास सहसा नसावा.

( ४ )पोटभाडेकरी ठेवण्याचा अधिकार भाडेकरूस नसावा, तो घरमालकाकडे असावा.

( ५ )नवीन घरें बांधण्याचे कामीं जो खर्च येईल त्यावर निव्वळ निदान ५ टक्केपर्यंत व्याज सुटेल असें भाडें त्या घरास आकारण्याची मालकांना परवानगी असावी. म्युनिसिपल व सरकारी कर वजा जातां जें उत्पन्न राहील तें निव्वळ उत्पन्न समजावें.

( ६ ) घरमालकांना त्यांचे स्वतःचे उपयोगासाठी जेव्हां जागा लागेल तेव्हां विशेष चिकित्सा न करतां ती त्यांना द्यावी.

( ७ ) घरमालकांचे ताब्यांतील जागा त्यांना स्वतःचे उपयोगासाठी लागत नाहीं असें सरकारला वाटल्यास त्यापैकीं कांहीं भाग घरमालकांनीं पसंतीच्या भाडेकऱ्यांना रहाण्यास भाड्यानें दिला पाहिजे असें बंधन घरमालकांवर ठेवावें.

( ८ ) रेंट ॲक्टच्या अमलबजावणीचे काम दिवाणी कोर्टाकडे द्यावें; व या बाबतींतल्या कोणत्याही प्रकरणाचें काम तीन महिन्यांच्या आंत संपविण्याचें बंधन न्यायाधीशावर ठेवावें. रेंटकंट्रोलरची जागा रद्द करावी.

( ९ ) घरमालकाला त्याचें येणें भाडें तात्डतोब मिळण्याची व्यवस्था करावी. थकबाकी असणाऱ्या भाडेकरूंना या कायद्याचे फायदे घेतां येणार नाहींत असें एक कलम असावें. डिस्ट्रेस वारंट काढण्याचा अधिकार घर मालकांना द्यावा.

( १० ) घरमालक जर भाडेकरूंना त्रास देत असेल अगर भाडेकरी जर घरमालकास त्रास देत असेल तर त्यांना योग्य ती दंडाची शिक्षा देण्याचा अधिकार या कायद्यान्वयें न्यायाधीशास द्यावा.

( ११ ) सरकारनें नवीन घरें बांधणारांना ३ टक्के दरानें कर्ज द्यावें, युद्धकालांत ज्यांनीं चाळी बांधून भाडेकरूंची सोय केली त्यांनाहि पाहिजे असल्यास ३ टक्के दरानें कर्ज द्यावें.


या प्रमाणें दोघांनाही न्याय मिळेल अशी जर कायद्याची रचना व अमलबजावणी केली तरच हा वर्गविग्रह थांबून आज रेंटकंट्रोल कोर्टींतील अनवश्यक गर्दी थांबेल. याचबरोबर सरकारनेंही थोडी आत्मीयता भाडेकरूंकरतां दाखवून ५।१० हजार कुटुंबांची सोय होईल अशा तात्पुरत्या चाळी बांधल्या तरच हा प्रश्न सहजगत्या सुटेल. नाहींतर केवळ घरमालकांना दडपून हा सामाजिक प्रश्न सुटण्यासारखा नाहीं हें सरकार लक्षांत घेईल काय !

## शेड्यूल्ड बँकांची तुलनात्मक परिस्थिति

( आकडे हजार रुपयांचे आहेत )

| | २७-१२-१९४६ | २८-१२-१९४५ | १-९-१९३९ |
|---|---|---|---|
| हिंदुस्थानांतील तातडीचीं देणीं | ७३०,१५,८७ | ६७२,५६,८८ | १३४,३६,४९ |
| हिंदुस्थानांतील कालांतराचीं देणीं | ३३०,९५,५६ | २८०,२५,९८ | १०२,२४,३४ |
| हिंदुस्थानांतील रोख शिल्लक | ४८,२६,७९ | ४२,३९,१७ | ६,६९,१२ |
| रिझर्व्ह बँकेकडील शिल्लक | ६९,००,९५ | ७८,४३,७२ | २५,१७,१९ |
| हिंदुस्थानांत दिलेलीं कर्जें | ४४२,३०,५४ | ३०२,८९,०९ | १०१,५२,१६ |
| हिंदुस्थानांत डिस्कौंट केलेल्या हुंड्या | २२,८७,९३ | २४,३०,२३ | ३,५७,२९ |


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.


फोन नं. २२७३८




# साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व माहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा यायाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

व्याज–वजा
शिंदिया स्टीम रु. १–४–० दि. २०–१–४७
+बॉम्बे बर्मा रु. १० दि. ९–१–४७

# मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

सासाहिक बंद भाव

व्याज–वजा
बेलापूर रु. ९ दि. १५–१–४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ७।१।४६ | बुधवार ८।१।४७ | गुरुवार ९।१।४७ | शुक्रवार १०।१।४७ | सोमवार १३।१।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६१७·८; २५२७–८ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २८२० | २७७२—८ | २८१७—८ | २८१० | २७८२—८ |
| ६३८; ४५७–८ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५०६—८ | ४९८—८ | ५०५—० | ५०३—८ | ५०१—० |
| ६५; ३६–४ | ०–८–०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | ३८—८ | ३७–१२ | ३६–१२ | ३६—९ | ३६–१४ |
| ७१·४; ४४–१० | ०–१४–०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ४६–१० | ४५–१२ | ४५—० | ४४—८ | ४५—३ |
| ३२७७–८; २१३२–८ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २९९० | २९६५ | २९९२—८ | २९८० | २९५० |
| ११८०; ६५८ | १२–०–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ९२२ | ९०६ | ९३५ | ९३२ | ९२५ |
| ९९९; ६६० | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७६३ | ७५१ | ७६७ | ७९४ | ८१९ |
| ५६७; ३९८ | ७–०–०S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४१५ | ४१० | ४१३ | ४१५ | ४१३ |
| ५५२; ३१४ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३९९ | ३९४ | ४०१ | ४०९ | ४१४ |
| ५७१; ३२३ | ६–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३७६ | ३७५ | ३८१ | ३८० | ३८० |
| ५९४; ३२५–८ | ९–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४४५ | ४३९ | ४४८ | ४४७ | ४४३ |
| ७४–६; ४–८–६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५—२ | ५—२—६ | ५—२—६ | ५—४ | |
| २९–१; १६–१२ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २०—२ | १९–१५ | २०—३ | २०—१ | २०—२ |
| ६–११–६; ३–३–६ | ०–३–० | म | ,, डिफर्ड्स | १ | ४—६ | ४—५—६ | ४—६ | ४—५—६ | ४—५ |
| १०९२–८; ७३५ | ४१–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८०२—८ | ७९७—८ | ८०० | ७९७—८ | ८०२—८ |
| २७८; २२५ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२९—८ | २२९ | २३० | २३० | २२९—८ |
| ३७५; २४० | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३४३ | ३४०—८ | ३४४ | ३४२ | ३४१ |
| ९१०; ६०५ | १०–०–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६९२—८ | ६८५ | ६८५+ | ६८५ | ६७५ |
| ६०–१० ३६–१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४६—६ | ४५–१५ | ४५–१३ | ४५—१ | ४४—५ |

शुक्रवार दि. १०–१–४७ चे भाव

| बँका | | बीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | २०० | आंध्र व्हॅली | १८१५ | अलकॉक | ६५२–८ |
| सेंट्रल | १४४—८ | बॉम्बे ट्रॅम | १३० | बॉबे स्टीम | ७५५ |
| इंडिया | २६० | टाटा ह्यायड्रो | २११–४ | न्यू इंडिया | १०७–८ |
| इंपी० | २९३० | टाटा पॉवर | १८७७–८ | शिवराजपुर | ५०–० |
| | ७३६—४ | | | टाटा केमिकल | १८–८ |
| रिझर्व्ह | १४८ | | | टाटा ऑईल | ११० |

**प्रांतिक सहकारी बँकेंत संप**—नागपूर येथील प्रां. सहकारी बँकेंतील कामगार ११ तारखेपासून संपावर गेले आहेत, तरी बँकेचा व्यवहार चालू आहे.

**बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाऊस**

| वर्ष | देवघेवीच्या चेक्सची संख्या | रक्कम (कोटि रु.) | प्रत्येक चेकची सरासरी रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १९४५ | ७६,२९,१२० | २४४३ | ३,२०२ |
| १९४६ | ८०,२२,९५४ | २८२६ | ३,५२३ |

१९४४ सालीं एकूण २१७३ कोटि रुपयांच्या ७२,४०,९९४ चेक्सची देवघेव झाली होती.

**उद्यम इंजिनिअरिंग लि., पुणें**—उद्यम मंडळाची मालमत्ता व व्यवहार विकत घेऊन तो पुढें चालविण्यासाठी ही कंपनी स्थापन झाली आहे. तिचें भांडवल ५ लक्ष रुपये असून तें 'ए' ऑर्डिनरी, 'बी' ऑर्डिनरी व ५% करमाफ रिडीमेबल क्यु. प्रे. शेअर्स ह्यांत विभागलेलें आहे. उद्यम मंडळाकडे मॅनेजिंग एजन्सी रहाणार आहे. कालेज सेल्स असोसिएशन लि. कंपनीनें तयार करावयाच्या स्टेशनरीची सोल डिस्ट्रिब्यूटर होईल.

**मुंबई प्रांतांत नव्या गिरण्या निघणार नाहींत**—चालू वर्षी मुंबई प्रांतांत एकहि नवी कपास गिरणी निघूं शकणार नाहीं, कारण ह्या प्रांताच्या वांट्यास १ लक्ष, १४ हजार चात्या आल्या आहेत त्या चालू गिरण्यांसाठीच आहेत. हिंदुस्थानांतील एकूण ४०० गिरण्यांपैकीं २०० पेक्षां ज्यास्त गिरण्या एकट्या मुंबई प्रांतातच आहेत आणि त्यांचें हें केंद्रीकरण आणखी वाढविण्यास हिंदुस्थान सरकार तयार नाहीं.

**पुणें येथील औद्योगिक प्रदर्शन**—पुणें येथील लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक प्रदर्शनाच्या कायम व्यवस्थेची तरतूद करण्यासाठीं मुंबई सरकारनें एक बिल तयार केलें आहे.

**निराधार बातमी**—शंभर रुपयेवाल्या नोटांचा कायदेशीरपणा काढून घेण्यांत येणार, अशी बाजारांत उठलेली बातमी निराधार असल्याचें रिझर्व्ह बँकेनें जाहीर केलें आहे.

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**—वरील बँकेस ३१ डिसेंबर १९४६ अखेरच्या वर्षी २९ लक्ष, ६३ हजार रु. नफा झाला. डिव्हिडंड देण्यांत येणार नाहीं.

**जी. डी. सी. ए.**—वरील सरकारी डिप्लोमाची परीक्षा पुणें येथें ७,८,९ व १० एप्रिल रोजीं होईल. अर्ज पाठविण्याची मुदत ता. १५ फेब्रुवारी अखेर आहे.

**दी आदर्श कृषि संस्था लि., नवग्रही, धुळें**—या कंपनीचे सहकार्यानें बागायतीला व शेतीला उपयुक्त अशा साहित्याचें व साधनांचें उत्पादन करण्याकरतां एका चालू कारखान्याची वाढ करण्याचें निश्चित झालें असून त्यास जानेवारीच्या मध्यास सुरवात होईल.

**ऑस्टिन मोटारींचें हिंदुस्थानांत उत्पादन**—ऑस्टिन मोटार कंपनी लवकरच हिंदुस्थानांत ऑस्टिन गाड्यांचें उत्पादन सुरू करणार आहे. हें उत्पादन करणारी कंपनी भांडवलाच्या मालकीचे दृष्टीनें हिंदी असली तरी ऑस्टिन कंपनी आपले तज्ज्ञ व यंत्रसामुग्री पाठविणार आहे.

## बँक ऑफ इंडिया लि., मुंबई

### १४% करमाफ डिव्हिडंड

३१ डिसेंबर १९४६ अखेर संपलेल्या वर्षी, मागील रु. १५,०३,४७१–११–२ शिल्लकी नफा धरून बँकेस रु. ८४,०३,३०९–२–७ नफा झाला. त्यांतून इन्कमटॅक्स, सुपरटॅक्स व एक्सेस प्रॉफिट टॅक्सच्या तरतुदीचे २१ लक्ष रुपये, व ३० जून १९४६ अखेरच्या सहामाहीच्या ५ १/२% इंटेरिम डिव्हिडंडचे रु. ८,१९,९६३–०–० वजा करतां वाटणीस रु. ५४,८४,३४४–२–७ उरतात. ३१ डिसेंबर १९४६ अखेरच्या सहामाहीसाठी ८ १/२% करमाफ फायनल डिव्हिडंड (म्हणजे वर्षासाठी १४% होतात) द्यावयाचा डायरेक्टरांचा विचार आहे, त्यास रु. १२,७४,८१५–०–० लागतील. हेड ऑफिस नवी मालमत्ता खातीं रु. ६,५०,०००–०–०, रिझर्व फंड खातीं रु. १२,९५,४८०–०–०, सरकारी व इतर रोखे खातीं रु. ३,००,०००–०००, शिल्लक (त्यांतून बोनसची तरतूद) रु. १९,६४,०४९–२–७ अशी एकूण रु. ८४,०३,३०९–२–७ ची विल्हेवाट आहे.

**सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.**—वरील बँकेस ३१ डिसेंबर अखेर संपलेल्या वर्षी १ कोटि, ४४ लक्ष रुपये नफा झाला. रिझर्व्ह फंडांतून २५ रुपयांचे पूर्णपणें वसूल झालेले २,१०,००० नवे शेअर्स भागीदारांना देण्यांत येतील. १ जून, १९४७ रोजीं भागीदारांच्या पटावर असणारांना त्यांच्या जुन्या प्रत्येक ५ शेअर्सच्या बदली हा एक नवा शेअर मिळेल.

**देवकरण नानजी बँकिंग कं. लि.**—वरील बँकेस १९४६ सालीं १० लक्ष, २० हजार रु. नफा झाला.

**बँक ऑफ जयपूर लि.**—वरील बँकेस १९४६ सालीं ७ लक्ष, ११ हजार रु. नफा झाला.

**१७ कोटींच्या नव्या भांडवल उभारणीस परवानगी**—कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें १ डिसेंबर ते १६ डिसेंबर, १९४६ ह्या मुदतींत २८ कंपन्यांना एकूण १७ कोटि, ३८ लक्ष रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी दिली. त्यांपैकीं १० कोटि रुपयांचें भांडवल एकट्या ओरिएंटल स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. मुंबई ह्या नव्या कंपनीचेंच आहे. अब्बासी टेक्स्टाइल मिल्स. लि. व नेमाणी कन्स्ट्रक्शन कं. लि. ह्यांना प्रत्येकीं १ कोटि रुपये भांडवल उभारण्यास परवानगी मिळाली आहे. भांडवल उभारणीस परवानगी ज्यांना मिळाली अशांच्या यादींत बँक ऑफ कोल्हापूर लि. ही आहे. १५,१९,५०० रुपयांचे नवे शेअर्स तिला विक्रीस काढतां येतील.

**नवी भांडवल उभारणी**—१७ डिसेंबर ते २३ डिसेंबर १९४६ ह्या मुदतींत कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें १२ कंपन्यांना १,३८,५०,००० रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी दिली. त्यांत युनायटेड बोर्ड अँड पेपर मिल्स लि., कलकत्ता ह्या चालू कंपनीस २ कोटींनीं भांडवल वाढविण्यास दिलेल्या परवानगीचा समावेश होतो. रेफन फर्टिलायझर्स अँड इंडस्ट्रीज लि. हुबळी ही १० लक्ष रुपयांची नवी कंपनी स्थापन होत आहे.

**श्री. नारायणराव नाईक**—बंगलोरचे श्री. नारायणराव नाईक हे यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी युरोपकडे लवकरच जाणार आहेत, असें समजतें.

**अमेरिकेचें नफ्याचें अंदाजपत्रक**—प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं १ जुलै १९४७ ते ३० जून १९४८ ह्या वर्षाच्या अमेरिकन सरकारी उत्पन्न–खर्चाचें अंदाजपत्रक काँग्रेसमध्यें मांडले, त्यांत खर्चापेक्षां उत्पन्न अधिक होण्याची अपेक्षा धरलेली आहे. १९३० नंतर प्रत्येक वर्षी अमेरिकन अंदाजपत्रक तुटीचेंच झालेलें असल्यामुळ, ह्या नव्या अंदाजपत्रकाचें महत्त्व आहे.

**बडोदा रेडिओ स्टेशन**—बडोद्याचें रेडिओ स्टेशन ता. १० रोजीं सुरू झालें. बडोद्याच्या महाराजांनीं प्रथम भाषण करून त्याचें उद्घाटन केलें.

सन १९४५ मधील प्रगति
नवें काम ७,००,००० रु.
चालू काम १०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न
सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

शेअर्स विकणें आहेत:—
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,
गोवर्धनवाडी, पुणें १.










चीफ एजंट:—
न्यू वृत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.